क्र.२/नमवि/प्रशासक/ ०७/२०२३-२०२४
सांगली मिरज कुपवाड शहर महानगरपालिका
दिनांक :- २० नोव्हेंबर २०२३

सांगली मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका
प्रशासक सभा क्रमांक - ०७/२०२३-२०२४
स्थायी समिती सभा कामकाजाकरिता प्रशासक सभेची नोटीस

ज्या अर्थी, महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील तरतुदीनुसार विविध कामकाज पार पाडण्यासाठी प्रस्तावित प्रस्तांबाना स्थायी समितीची पुर्व मान्यता देणे आवश्यक आहे आणि,

ज्या अर्थी महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम ६, ६(अ) मधील तरतुदीनुसार सांगली मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका नगरमंडळाची मुदत दि.१९ ऑगस्ट २०२३ रोजी संपुष्टात आलेली असल्याने सद्य:स्थितीत स्थायी समिती अस्तित्वात नाही, आणि,

ज्या अर्थी, महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमाखाली सर्व अधिकारांचा वापर करण्यासाठी आणि तिची सर्व कामे व कर्तव्ये पार पाडण्यासाठी महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील तरतुदी व विशेषत: कलम ४५२ (अ) मधील तरतुदीनुसार सांगली मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिकेच्या प्रशासक पदी आयुक्त,सांगली मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका यांची दि.२४/०८/२०२३ रोजीचे मा.शासन आदेशान्वये नियुक्ती करण्यात आलेली आहे.

त्या अर्थी, स्थायी समितीच्या मान्यतेने पार पाडावयाचे कामकाज पुर्ण करण्यासाठी प्रशासक यांच्या अध्यक्षतेखाली **मंगळवार दि.२१/११/२०२३ रोजी सकाळी ११.३० वाजता पद्मभूषण डॉ.वसंतरावदादा पाटील सभागृह मुख्यालय, सांगली** येथे सभा आयोजित केली आहे. सदर सभेमध्ये खालील परिशिष्ठातील विषय विचाराधीन आहेत. तरी सदर सभेस सर्व संबंधीत अधिकारी यांनी उपस्थित रहावे.

परिशिष्ठ

१. मागील स्थायी समिती प्रशासक सभा दि.०७/११/२०२३ रोजीचे कार्यवृत्त वाचून कायम करणे.

२. मुख्य अग्निशमन अधिकारी यांचेकडील दि.२९/०९/२०२३ ते दि.०५/१०/२०२३, दि.०६/१०/२०२३ ते १२/१०/२०२३, दि.१३/१०/२०२३ ते दि.१९/१०/२०२३ आणि दि.२०/१०/२०२३ ते दि.२६/१०/२०२३ अखेरचे आगीचे विवरण पत्रे अवलोकनी घेणे.

३. कुपवाड उल्हासनगर स.नं.७७४ महावीर व्यायाम शाळा लगतच्या ओपन स्पेसला कंपौंड करणे या मंजूर विकास कामाची जागा बदलून कुपवाड वॉर्ड क्र.८ मधील स.नं.९४ (नवनि ४६/२) या मनपा खुल्या जागेत सदरचे काम मंजूर मक्तेदार मे.वैष्णो मजूर सह.सोसा.लि. सांगली यांचेकडून निविदा र.रु.२२,३४,६७९/- मात्र निविदा रक्कमेच्या ०.०१% कमी दराने करुन घेणेस मान्यता देणेकामी **उपायुक्त (बांधकाम विभाग) यांचे दि.१०/११/२०२३ चे विषयपत्र.**

४. मिरज वॉर्ड क्र.२० मधील निलजी बामणी कडे खतीब हॉल पासून जाणारा रस्ता (अर्थव गारमेंट ते रेल्वे ब्रिज खालून रत्नागिरी हायवे कडे जाणारा रस्ता) डांबरीकरण करणे अंदाजपत्रक र.रु.२९,८२,३४०/- मात्रचे कामी महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील प्रकरण ५ संविदा खंड २(१) अन्वये रितसर जाहिर निविदा प्रसिद्ध करुन निविदा मागविणेस व त्याकामी येणारे खर्चास मान्यता देणेकामी **उपायुक्त (बांधकाम विभाग) यांचे दि.१७/११/२०२३ चे विषयपत्र.**

५. महापालिकेच्या वड्डी येथील घनकचरा व्यवस्थापन या जागेमध्ये "जैवविविधता उद्यान" उभारणी करणेकरिता सह्याद्री देवराई सामाजिक संस्था,मालाड यांचे बरोबर करार करुन घेणे तसेच अन्य कायदेशीर बाबींची पुर्तता करुन घेणेस मान्यता देणेकामी **उपायुक्त (बांधकाम (उद्याने) विभाग) यांचे दि.१७/११/२०२३ चे विषयपत्र.**

मा.प्रशासक तथा आयुक्तसो यांचे मान्यतेने

प्र.महापालिका सचिव,
सांगली मिरज आणि कुपवाड शहर
महानगरपालिका

सांगली मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

स्थायी समिती प्रशासक सभा क्रमांक :- ०७/२०२३-२४ दिनांक :- २१/११/२०२३ चे इतिवृत्त

सांगली मिरज कुपवाड शहर महानगरपालिकेची स्थायी समिती प्रशासक सभा क्र.०७ दि.२१/११/२०२३ रोजी महापालिकेच्या पद्मभूषण डॉ.वसंतराव दादा पाटील सभागृह, सांगली येथे सकाळी ११.३० वाजता आयोजित करणेत आलेली होती. सदर प्रशासक स्थायी समिती सभेकरीता खालील अधिकारी उपस्थित होते.

अ. क्र.	उपस्थितांची नावे	अ. क्र.	उपस्थितांची नावे
१.	श्री.सुनिल पवार – प्रशासक	२.	श्री.संजय ओहोळ – अतिरिक्त आयुक्त,मिरज
३.	श्रीमती स्मृती पाटील – उपायुक्त,मिरज	४.	श्री.वैभव साबळे – उपायुक्त
५.	श्री.पृथ्वीराज चव्हाण –शहर अभियंता	६.	श्री.शिरिष धनवे – मुख्य लेखापरिक्षक
७.	श्री.सुशीलकुमार केंबळे – मुख्य लेखापाल	८.	श्री.वैभव पाटील - वैद्यकिय आरोग्याधिकारी
९.	श्री.विनय झगडे – स.स.न.र	१०.	श्री.विनायक शिंदे – प्रशासन अधिकारी
११.	श्री.नितीन शिंदे – कर निर्धारक व संकलक/मालमत्ता	१२.	श्री.चिदानंद कुरणे-कार्यकारी अभियंता,पा.पु./जल.वि.सां./मि.
१३.	श्री.सहदेव कावडे– सहा.आयुक्त,प्र.स.क्र.१	१४.	श्री.सचिन सागावकर – सहा.आयुक्त,प्र.स.क्र.२
१५.	श्री.मानसिंग पाटील - सहा.आयुक्त,प्र.स.क्र.३	१६.	श्री.तेजस शहा - ज्युनि.इंजिनियर वर्कशॉप,सांगली
१७.	श्री.परमेश्वर हलकुडे - नगर अभियंता,सांगली	१८.	श्री.भगवान पांडव - नगर अभियंता मिरज / ना.दा.नि.कक्ष
१९.	श्री.धनंजय हर्षद - जनसंपर्क / विधी अधिकारी	२०.	श्री.गिरीष पाठक- उद्यान अधिक्षक
२१.	श्री.नकुल जकाते – सिस्टिम मॅनेजर	२२.	श्री.सुनिल माळी- अग्निशमन अधिकारी
२३.	श्री.विनायक जाधव – ज्यु.इंजि.वर्कशॉप मिरज	२४.	श्री.सुनिल पाटील - विशेष कार्यकारी अधिकारी,पा.पु.वि.
२५.	श्री.जेलर – क्रिडा अधिकारी		

महापालिका सचिव यांनी सभेच्या सुरुवातीला मा.प्रशासक व सर्व अधिकारी यांचे स्वागत करुन, सभेच्या कामकाजास मा.प्रशासक यांच्या आदेशाने सुरुवात केली.

विषय क्र. ०१ मागील स्थायी समिती प्रशासक सभा दि.०७/११/२०२३ रोजीचे कार्यवृत्त वाचून कायम करणे.

प्रशासक विषय मंजुर

विषय क्र. ०२ मुख्य अग्निशमन अधिकारी यांचेकडील दि.२९/०९/२०२३ ते दि.२६/१०/२०२३ अखेरचे आगीचे विवरण पत्रे अवलोकनी घेणे.

प्रशासक किती आगी लागल्या, दिवाळी मध्ये खास करुन आगी लागल्या का?

अग्निशमन अधिकारी आगीच्या किरकोळ घटना घडलेल्या आहे. कोणतीही मोठी घटना अथवा जिवित हानी नाही.

प्रशासक विषय मंजुर

विषय क्र. ०३	कुपवाड उल्हासनगर स.नं.७७४ महावीर व्यायाम शाळा लगतच्या ओपन स्पेसला कंपौंड करणे या मंजूर विकास कामाची जागा बदलून कुपवाड वॉर्ड क्र.८ मधील स.नं.९४ (नवनि ४६/२) या मनपा खुल्या जागेत सदरचे काम करुन घेणेस मान्यता देणे.
प्रशासक	जागा बदलणेचे कारण काय?
शहर अभियंता	जागा अपुरी पडत असल्याने कामगिरी करणेचे अडचणीचे आहे.
प्रशासक	जिल्हा नियोजन समितीकडे मान्यतेसाठी पाठवा.
विषय क्र. ०४	मिरज वॉर्ड क्र.२० मधील निलजी बामणी कडे खतीब हॉल पासून जाणारा रस्ता (अर्थव गारमेंट ते रेल्वे ब्रिज खालून रत्नागिरी हायवे कडे जाणारा रस्ता) डांबरीकरण करणे जाहिर निविदा मागविणेस मान्यता देणे.
प्रशासक	कोणत्या निधीतून कामगिरी प्रस्तावित आहे.
शहर अभियंता	५% समाज कल्याण निधी तून प्रस्तावित आहे.
प्रशासक	विषय मंजूर

येणेप्रमाणे सभेचे कामकाज पुर्ण झाल्यानंतर मा.प्रशासक यांनी सभा संपलेचे जाहिर केले.

दिनांक :- २१/११/२०२३

(सुनिल पवार)
प्रशासक तथा आयुक्त
सांगली मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

सांगली मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

स्थायी समिती प्रशासक सभा क्रमांक :- ०७/२०२३-२४

स्थायी समिती प्रशासक ठराव क्रमांक :- ५९ **दिनांक :- २१/११/२०२३**

विषय क्रमांक :- ०१

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील तरतुदी व विशेषत: कलम ४५२ अ मधील तरतुदीनुसार महाराष्ट्र शासन नगरविकास विभागाकडील दि.२४/०८/२०२३ रोजीचे आदेशान्वये प्रशासक म्हणून प्राप्त अधिकारानुसार मा.स्थायी समितीच्या अधिकारांचा वापर करुन,

मागील स्थायी समिती प्रशासक सभा दि.०७/११/२०२३ रोजीच्या कार्यवृत्तातील ठराव क्र. ४८ ते ठराव क्र. ५८ हे वाचून दाखविण्यात आले. सदरचे कार्यवृत्त वाचून ही सभा सर्वानुमते कायम करीत आहे.

(सुनिल पवार)
प्रशासक तथा आयुक्त
सांगली मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

स्थायी समिती विभाग

महापालिका सचिव
सांगली मिरज कुपवाड शहर महानगरपालिका

सांगली मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

स्थायी समिती प्रशासक सभा क्रमांक :- ०७/२०२३-२४

स्थायी समिती प्रशासक ठराव क्रमांक :- ६० **दिनांक :- २१/११/२०२३**

विषय क्रमांक :- ०२

सोबतचे उपायुक्त (पाणी पुरवठा विभाग) यांचे दि.०६/११/२०२३ चे विषयपत्राचे अवलोकन करणेत आले.

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील तरतुदी व विशेषत: कलम ४५२ अ मधील तरतुदीनुसार महाराष्ट्र शासन नगरविकास विभागाकडील दि.२४/०८/२०२३ रोजीचे आदेशान्वये प्रशासक म्हणून प्राप्त अधिकारानुसार मा.स्थायी समितीच्या अधिकारांचा वापर करुन,

मुख्य अग्निशमन अधिकारी यांचेकडील दि.२९/०९/२०२३ ते दि.०५/१०/२०२३, दि.०६/१०/२०२३ ते १२/१०/२०२३, दि.१३/१०/२०२३ ते दि.१९/१०/२०२३ आणि दि.२०/१०/२०२३ ते दि.२६/१०/२०२३ अखेरचे आगीचे विवरण पत्रे अवलोकनी घेवून परत पाठवित आहे.

(सुनिल पवार)
प्रशासक तथा आयुक्त
सांगली मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

महापालिका सचिव
सांगली मिरज कुपवाड शहर महानगरपालिका

सांगली मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

स्थायी समिती प्रशासक सभा क्रमांक :- ०७/२०२३-२४

स्थायी समिती प्रशासक ठराव क्रमांक :- ६१ **दिनांक :- २१/११/२०२३**

विषय क्रमांक :- ०३

सोबतचे उपायुक्त (बांधकाम विभाग) यांचे दि.१०/११/२०२३ चे विषयपत्राचे अवलोकन करणेत आले.

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील तरतुदी व विशेषत: कलम ४५२ अ मधील तरतुदीनुसार महाराष्ट्र शासन नगरविकास विभागाकडील दि.२४/०८/२०२३ रोजीचे आदेशान्वये प्रशासक म्हणून प्राप्त अधिकारानुसार मा.स्थायी समितीच्या अधिकारांचा वापर करुन,

कुपवाड उल्हासनगर स.नं.७७४ महावीर व्यायाम शाळा लगतच्या ओपन स्पेसला कंपौंड करणे या मंजूर विकास कामाची जागा बदलून सदरचे काम कुपवाड वॉर्ड क्र.८ मधील स.नं.९४ (नविन ४६/२) या मनपा खुल्या जागेस कंपौंड बांधणे बाबत सन्मा.सदस्य श्री.विष्णू आण्णासाहेब माने यांनी दि.३१/०७/२०२३ रोजीच्या पत्रान्वये जागा बदलणेबाबत परिसरातील नागरिकांनी मागणी केलेली आहे असे कळविले आहे. त्यानुसार प्रत्यक्ष पहाणी करुन सदरची मंजुर कामाची जागा अपुरी पडत असल्याने कुपवाड वॉर्ड क्र.८ मधील स.नं.९४ (नविन ४६/२) या मनपा खुल्या जागेस कंपौंड बांधणेस मान्यता मिळणेबाबत मा.जिल्हा नियोजन समिती, जिल्हाधिकारी कार्यालय, सांगली यांचेकडे प्रशासकीय मान्यता मिळणेसाठी प्रस्ताव सादर करणेस मान्यता देणेत येत आहे.

(सुनिल पवार)
प्रशासक तथा आयुक्त
सांगली मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

महापालिका सचिव
सांगली मिरज कुपवाड शहर महानगरपालिका

सांगली मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

स्थायी समिती प्रशासक सभा क्रमांक :- ०७/२०२३-२४

स्थायी समिती प्रशासक ठराव क्रमांक :- ६२ **दिनांक :-** २१/११/२०२३

विषय क्रमांक :- ०४

सोबतचे उपायुक्त (बांधकाम विभाग) यांचे दि.१७/११/२०२३ चे विषयपत्राचे अवलोकन करणेत आले.

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील तरतुदी व विशेषत: कलम ४५२ अ मधील तरतुदीनुसार महाराष्ट्र शासन नगरविकास विभागाकडील दि.२४/०८/२०२३ रोजीचे आदेशान्वये प्रशासक म्हणून प्राप्त अधिकारानुसार मा.स्थायी समितीच्या अधिकारांचा वापर करुन,

मिरज वॉर्ड क्र.२० मधील निलजी बामणी कडे खतीब हॉल पासून जाणारा रस्ता (अर्थव गारमेंट ते रेल्वे ब्रिज खालून रत्नागिरी हायवे कडे जाणारा रस्ता) डांबरीकरण करणे अंदाजपत्रक र.रु.२९,८२,३४०/- मात्रचे कामी महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील प्रकरण ५ संविदा खंड २(१) अन्वये रितसर जाहिर निविदा प्रसिद्ध करुन निविदा मागविणेस व त्याकामी येणारे खर्चास विषयपत्रातील शिफारशीनुसार मान्यता देणेत येत आहे.

उक्त कामी येणारा खर्च विषयपत्रातील नमुद अर्थसंकल्पीय तरतुदी मधून होणेचा आहे.

महापालिका सचिव
सांगली मिरज कुपवाड शहर महानगरपालिका

(सुनिल पवार)
प्रशासक तथा आयुक्त
सांगली मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

सांगली मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

स्थायी समिती प्रशासक सभा क्रमांक :- ०७/२०२३-२४

स्थायी समिती प्रशासक ठराव क्रमांक :- ९३ **दिनांक :-** २१/११/२०२३

विषय क्रमांक :- ०५

सोबतचे उपायुक्त (बांधकाम उद्याने विभाग) यांचे दि.१७/११/२०२३ चे विषयपत्राचे अवलोकन करणेत आले.

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील तरतुदी व विशेषत: कलम ४५२ अ मधील तरतुदीनुसार महाराष्ट्र शासन नगरविकास विभागाकडील दि.२४/०८/२०२३ रोजीचे आदेशान्वये प्रशासक म्हणून प्राप्त अधिकारानुसार मा.स्थायी समितीच्या अधिकारांचा वापर करुन,

महानगरपालिकेच्या वड्डी येथील कचरा डेपो येथे मनपा मालकीची जवळपास ६ एकर जागा उपलब्ध असून, सदर वड्डी येथील घनकचरा व्यवस्थापन या जागेमध्ये जैवविविधता उद्यान करणेची अध्यक्ष,सह्याद्री देवराई सामाजिक संस्था,मालाड श्री.सयाजी शिंदे यांनी तयारी दर्शविली असून, सदर संस्थेमार्फत शास्त्रीय पद्धतीने देशी प्रजातीची विविध रोपे लागवड करण्यात येणार आहे. त्याबाबतचा आराखडा सदर संस्था तयार करणार असून, त्या पद्धतीने रोपांची लागवड संस्था विनामुल्य करणार आहे त्यानंतर मेंटनन्स् महापालिकेने ठेवणेचा आहे. मा.आयुक्तसो व सह्याद्री देवराई सामाजिक संस्था मालाड यांचे समवेत झाले चर्चेनुसार महापालिकेने जागा उपलब्ध करुन देणेची आहे व चार कर्मचारी,पाणी,विज कनेक्शन व विज बिल सदर संस्थेस महापालिकेने पुरविणेचे आहे. सदर दुर्मिळ उद्यान निर्मिती नंतर विविध प्रकारचे पक्षी, फुलपाखरु यांची एक नैसर्गिक साखळी निर्माण होणार आहे. सदरचा प्रकल्प तयार झालेस त्याचा फायदा माझी वसुंधरा अभियानांतर्गत महापालिकेस होणार असलेने, सह्याद्री देवराई सामाजिक संस्था,मालाड यांचे बरोबर करार करुन घेणेस व अन्य कायदेशीर बाबींची पुर्तता करुन घेणेस मान्यता देणेत येत आहे.

(सुनिल पवार)
प्रशासक तथा आयुक्त
सांगली मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

महापालिका सचिव
सांगली मिरज कुपवाड शहर महानगरपालिका